0001

<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक **नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर**</u>

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०८/११/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७६/२०१२/जा.७९०, दिनांक १०/११/२०१२ व ०५/१२/२०१२.

३) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक ०३/१२/२०१२ रोजीचा अहवाल.

४) दिनांक ०४/१२/२०१२, ०५/१२/२०१२ व १३/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित साठा मालकांनी तसेच इतर साठामालकांनी सुनावणीपूर्वी टपालामार्फत सादर केलेली स्वतंत्र लेखी निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७६/२०१२/जा. ८१८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इश्युरस इमारत, ५ वा मज़ला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १८/१२/२०१२

**आ दे श**

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेज, ए ७९, टिटिसी एमआयडीसी इंडस्ट्रियल एरीया, खैरणे या ठिकाणी व्यापाऱ्यांनी विनापरवाना कडधान्य, तेलबिया व अन्नधान्याची साठवणूक केली असल्याची खबर मिळाल्यानुसार सदरच्या बातमीची खातरजमा करण्यासाठी भेट देवून सदर आस्थापनेच्या कार्यालयात उपस्थित व्यक्तिस नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव श्री. हेमंत शिवजी सुआली, वय - ५६ वर्षे, धर्म- हिंदू, रहाणार - ई-२९, ३/४, पंचकमल, सेक्टर-२९, वाशी, नवीमुंबई ४०० ७०३ असे सांगून उपरोक्त आस्थापनेत जनरल मॅनेजर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी उपस्थितास मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेज या ठिकाणी शिल्लक साठयाबाबत व सदर साठयाच्या साठवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांची माहीती विचारली असता त्यांनी संगणकामधून व्यापारीनिहाय व जिन्नसनिहाय शिल्लक असलेल्या साठयाची तपशीलवार माहीती स्वत:च्या स्वाक्षरीनिशी उपलब्ध करुन दिली. सदर संगणकीय विवरणपत्रानुसार एकुण ४७६१७

बाचक्यांमधील एकुण १७१२७.९० क्विंटल अन्नधान्य व कडधान्य या अनुसुचीत वस्तुंचा साठा नमुद असल्याचे दिसुन आले. तसेच याव्यतिरीक्त अनुसुचीत वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेले गहु, ज्वारी, बाजरी इ. २२०४६ बाचक्यांमधील एकुण ८२०२.२० क्विंटल अन्नधान्याचा साठा नमुद असल्याचे पथकास आढळून आले.

संगणकीय साठेपुस्तकानुसार एकूण ७२३३८ बाचकी साठा घटनास्थळी असल्याचे आढळून आले. उपरोक्त नमुद अन्नधान्य व कडधान्याच्या साठया व्यतिरीक्त असलेला सुकामेवा, आयुर्वेदिक हर्बल आयटम, मसाल्याचे पदार्थ, आईस्क्रिम ॲन्ड मिल्क प्रोडक्टस, फ्रोझन व्हेजीटेबल्सच्या साठयाची नोंद करण्यात आलेली नाही.. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर आस्थापनेतील मुद्देमालाची प्रत्यक्ष मोजदाद करण्यासाठी तळघर, तळमजला व वरील चार मजले येथील एकूण ३७ खोल्यांची पाहाणी केली असता त्यापैकी ३ खोल्यांमध्ये हर्बल, ४ खोल्यामध्ये आईस्क्रिम व मिल्क प्रोडक्टस व उर्वरीत ३० खोल्यामध्ये खालीलप्रमाणे साठा आढळून आला.

| अ.क्र. | मुद्देमालाचा तपशिल | साठा/नग (बाचकी) | वजन क्विंटलमध्ये |
|---|---|---|---|
| १ | तांदूळ | ७९ | २५.४० |
| २ | तिळ | २०६ | ५१.५० |
| ३ | मुग | १८८५१ | ५९९६.८० |
| ४ | चवळी | १६४३७ | ६६९६.४० |
| ५ | वाटाणा | ६४२५ | २३५५.४५ |
| ६ | चणा | २८७२ | ११५३.४० |
| ७ | वाल | १०२४ | ४०६.८० |
| ८ | मसूर | २२८ | ८४.४० |
| ९ | मटकी | १४१६ | ४३०.४० |
| १० | उडीद | १४ | ७.०० |
| ११ | तूर | ७० | २१.०० |
| १२ | राजमा सफेद | ३८८ | १९४.०० |
| १३ | मुगडाळ | १६४० | ४९७.०० |
| १४ | तूरडाळ | १७७ | ८८.५० |
| १५ | उंडीद डाळ | ४० | १२.०० |
| १६ | चणा डाळ | २२५ | ११२.५० |
| | एकूण | ५००९२ | १८१३२.५५ |

| अ.क्र. | मुद्देमालाचा तपशिल | साठा/नग (बाचकी) | वजन क्विंटलमध्ये |
|---|---|---|---|
| १ | गहू | ११७८३ | ३६२९.३० |
| २ | काबूली चणा | ६१२८ | २५४१.०० |
| ३ | ज्वारी | ३३०० | १६३०.०० |
| ४ | बाजरी | २०० | १००.०० |
| | एकूण | २१४११ | ७९००.३० |

सदर ठिकाणी ज्या व्यापाऱ्यांनी साठा ठेवला आहे ते परवानाधारक आहेत किंवा कसे ? याबाबतच्या कागदपत्रांची मागणी केली असता, उपस्थितांनी एकूण ८२ व्यापाऱ्यांपैकी ६ आयातदार वगळता ८ व्यापाऱ्यांचे कागदपत्रे अधिकाऱ्याना उपलब्ध करुन दिले. अधिकाऱ्यांनी त्यांचेजवळ घटनास्थळी उपलब्ध असलेल्या अभिलेखाची पडताळणी केली असता उपरोक्त ८२ व्यापाऱ्यापैकी ६ व्यापारी आयातदार असून त्यापैकी ४ आयातदार व्यापाऱ्यांकडे स्थानिक परवानाही असल्याचे निदर्शनास आले व २ आयातदारांनी साठयाची माहीती कार्यालयास सादर केल्याचे सांगितले. तसेच उर्वरीत ७६ व्यापाऱ्यांपैकी ३१ व्यापारी परवानाधारक असल्याचे आढळून आले. ४ आयातदार परवानाधारक व ३१ परवानाधारक अशा एकूण ३५ परवानाधारकांपैकी १७ व्यापाऱ्यांनी परवान्यावर गोदाम नोंद करुन घेतल्याचे निदर्शनास आले तर एका व्यापाऱ्याने परवान्यावर गोदाम नोंदणीसाठी अर्ज केल्याचे आढळले. म्हणजेच ३५ पैकी १७ परवानाधारकांनी सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेज, ए ७९, टिटिसी एमआयडीसी इंडस्ट्रियल एरीया, खैरणे या कोल्ड स्टोरेजची परवान्यावर गोदाम नोंद केली नसल्याचे आढळले. उर्वरीत ४५ व्यापाऱ्यांकडे परवाने आहेत किंवा कसे याबाबत अधिकाऱ्यांनी उपस्थितास विचारणा केली असता आपल्याकडे त्याबाबत कोणतीही माहीती नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच व्यापाऱ्याकडून साठा ठेवण्यापूर्वी वैध कागदपत्र न घेता साठा कां ठेवला अशी विचारणा करता त्यांनी यापैकी बरेचसे व्यापारी किरकोळ व्यवसाय करीत असून पुण्याबाहेरचे/मुंबईचे आहेत. मुंबईत साठवणूकीकरीता जागा उपलब्ध नसल्याने एपीएमसी मार्केट मधून घाऊक खरेदी नंतर साठा आमच्याकडे ठेवतात व आवश्यकतेनुसार घेऊन जातात. व्यापारी किरकोळ व्यवसाय करीत असल्याने परवान्याबाबत विचारणा केली नाही ही चूक त्यांना मान्य आहे. यापुढे योग्य ती खबरदारी घेण्यात येईल असे उपस्थिताने सांगितले. संगणकीय साठेपुस्तकानुसारचा साठा व प्रत्यक्षात आस्थापनेच्या कर्मचारी वर्गासोबत मोजदाद केलेला साठा यामध्ये आढळलेल्या तफावतीबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, त्यांनी संगणकीय साठेपुस्तकांनुसार प्रत्यक्ष साठा असल्याचे खात्रीपूर्वक त्यांनी सांगितले. तसेच प्रत्यक्ष साठयामध्ये कोणतीही कमी आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची असल्याचे पंचासमक्ष त्यांनी लेखी दिले. कोल्ड स्टोअरेजमध्ये ज्या व्यापाऱ्यांनी साठा ठेवला आहे त्यांचे कोणतेही कागदपत्र त्यांनी घेतलेले नसुन सदरचा साठा त्यांच्या चुकीमुळे जप्त केला गेला आहे असे निवेदन देवून त्यांच्याकडील अन्नभेसळ व कारखाना नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर केली.

तदनंतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी आढळलेल्या ८२ व्यापाऱ्यांपैकी ज्या परवान्यावर सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेज प्रा. लि., ए ७९, टिटिसी एमआयडीसी इंडस्ट्रियल एरीया, खैरणेची गोदाम म्हणून नोंद केल्याची आढळलेल्या १७ + १ अर्ज सादर केलेल्या व ज्वारी, बाजरी आणि गव्हाचा साठा असलेल्या ५ अशा एकूण २३ व्यापाऱ्यांचा साठा वगळून, इतर साठयाबाबत कागदपत्र उपलब्ध न झाल्याने उर्वरीत ५९ व्यापाऱ्यांचा खालील नमूद

0004
साठा पंचांसमक्ष जप्त करुन तसेच सदरचा सर्व साठा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत सुरक्षित ठेवण्याच्या लेखी सूचना सहीत सूपूर्दनामा करुन श्री. हेमंत शिवजी सुआली, जनरल मॅनेजर यांच्या ताब्यात दिला. तसेच ज्या ५९ व्यापाऱ्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे, त्यांना पुढील आदेश प्राप्त होण्यापूर्वी कोणताही साठा वितरीत केल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या आस्थापनेवर जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी पंचांसमक्ष समज दिली.

<u>सॅनफूड अॅन्ड कोल्ड स्टोरेज येथे तपासणीच्यावेळी सूपूर्द केलेल्या मालाचा तपशिल</u>

| अ. क्र. | व्यापाऱ्याचे नाव | जिन्नसाचा प्रकार | बाचकी | वजन | एकूण वजन (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|
| १ | भगवती ट्रेडर्स | चणा | १५० | ५० | ७५.०० |
| २ | भक्ती डोंबीवली | मूग | ६ | ३० | १.८० |
| | | चवळी | २ | ३० | ०.६० |
| ३ | चरण स्टोअर्स | वाटाणा | ५ | ५० | २.५० |
| | | चणा | ९ | ३० | २.७० |
| ४ | देढीया स्टोर्स | मुग | ४८ | ३० | १४.४० |
| | | चवळी | ५० | ३० | १५.०० |
| | | वाल | १८ | ३० | ५.४० |
| ५ | देवराम भाई खार | मुग | १० | ३० | ३.०० |
| ६ | धनवीर ट्रेडींग | वाल | २२ | ३० | ६.६० |
| | | वाल | ८० | ५० | ४०.०० |
| ७ | गुलाब ट्रेडर्स | वाटाणा | १७ | ३० | [illegible] |
| | | वाटाणा | १३ | ५० | ६.५० |
| | | चणा | १० | ३० | ३.०० |
| ८ | हंसराज भारमल | मुग | ३ | ३० | ०.९० |
| | | चवळी | ८ | ३० | २.४० |
| | | चणा | २१ | ३० | ६.३० |
| | | मसूर | २६ | ३० | ७.८० |
| ९ | हेम सन्स पारला | मुग | १२ | ३० | ३.६० |
| १० | हिंगलाज एन्टरप्रायजेस | चवळी | ३०५ | ३० | ९१.५० |
| | | वाटाणा | ३० | ५० | १५.०० |
| ११ | हितेन अॅंड कं | मुग | ४४८ | ५० | २२४.०० |
| | | चवळी | ३३७ | ५० | १६८.५० |
| | | वाटाणा | ६ | ३० | १.८० |
| | | चणा | ५ | ५० | २.५० |
| | | मटकी | २८ | ३० | ८.४० |
| | | डाळी | २६ | ३० | ७.८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | जे जे एंटरप्रायजेस | मुग | ४६४ | ३० | १३९.२० |
| | | चवळी | १०० | ३० | ३०.०० |
| | | चणा | ९ | ५० | ४.५० |
| | | मटकी | ३० | ३० | ९.०० |
| १३ | जे के दालमिल | मुग | २२ | ३० | ६.६० |
| १४ | जे पी स्टोर | मुग | ८५ | ५० | ४२.५० |
| | | मुग | २५ | ६० | १५.०० |
| १५ | जाधवजी नरसी | मुग | ४ | ३० | १.२० |
| १६ | जनता(पी)स्टोर्स | वाटाणा | १३ | ३० | ३.९० |
| | | चणा | ६ | ३० | १.८० |
| | | मटकी | २६ | ३० | ७.८० |
| १७ | जनता स्टोर्स | मुग | ५० | ३० | १५.०० |
| | | चणा | १६ | ३० | ४.८० |
| | | मटकी | २५ | ३० | ७.५० |
| | | डाळी | २५ | ३० | ७.५० |
| | | डाळी | २५ | ५० | १२.५० |
| १८ | जशोदा एंटरप्रायजेस | डाळी | २०० | ५० | १००.०० |
| १९ | जीवन सोसायटी स्टोर्स | मटकी | ३ | ३० | ०.९० |
| २० | जीगर नवीन ॲड के | चणा | १९० | ५० | ९५.०० |
| २१ | के किशारे ॲड कं | तांदूळ | १० | ५० | ५.०० |
| २२ | किरण एंटरप्रायजेस | चणा | ९३ | ३० | २७.९० |
| २३ | किर्ती स्टोर्स | वाटाणा | ७ | ५० | ३.५० |
| २४ | क्रियाना घरए-३ | चवळी | ८५ | ३० | २५.५० |
| | | चवळी | ४५ | ५० | २२.५० |
| २५ | कुंवरजी खिमराज अनाज | मुग | २४० | ५० | १२०.०० |
| | | मुग | ८ | ६० | ४.८० |
| | | चवळी | ११६ | ३० | ३४.८० |
| | | वाटाणा | १५ | ३० | ४.५० |
| | | वाटाणा | ५५ | ५० | २७.५० |
| | | चणा | २०४ | ५० | १०२.०० |
| | | चणा | ४१३ | ३० | १२३.९० |
| | | वाल | ६७ | ३० | २०.१० |
| | | मटकी | ७८ | ३० | २३.४० |
| | | उडीद | १५ | ५० | ७.५० |
| | कुंवरजी खिमराज | तांदूळ | ४८ | ४० | १९.२० |
| | | तांदूळ | १९० | २० | ३८.०० |
| २६ | एल के मसाला | चणा | १० | ५० | ५.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| २७ | महावीर ट्रेडींग | चवळी | ९ | ५० | ४.५० |
| २८ | मेघराज मार्के टींग | चवळी | १८ | ३० | ५.४० |
| २९ | मोहनलाल ब्रदर्स | मुग | ३२ | ३० | ९.६० |
| ३० | मुक्ती स्टोर्स | मटकी | ४० | ३० | १२.०० |
| ३१ | निता स्टोर्स | मुग | ५४ | ३० | १६.२० |
| | | चवळी | २६ | ३० | ७.८० |
| | | मटकी | १२ | ३० | ३.६० |
| ३२ | निरुपमा स्टोर्स | तांदूळ | २२ | ५० | ११.०० |
| ३३ | पराग ट्रेडींग कं | चवळी | ११४ | २५ | २८.५० |
| | | चवळी | ३५७ | ३० | १०७.१० |
| | | वाल | ६० | ३० | १८.०० |
| ३४ | पटेल रिटेल प्रा.लि | चणा | ६० | ३० | १८.०० |
| | | चणा | १६० | ५० | ८०.०० |
| ३५ | पटेल स्टोर्स | मुग | ८ | ३० | २.४० |
| ३६ | प्रविण चंद ठाकरसी ॲंड सन्स | चवळी | ७५ | ३० | [illegible] |
| | | चवळी | ३३ | ५० | १६.५० |
| ३७ | प्रविण चंद ठाकरसी ॲंड कं | चवळी | ६२७ | ३० | १८८.१० |
| | | चवळी | ७९ | ५० | ३९.५० |
| | | राजमा | २८५ | ५० | १४२.५० |
| ३८ | रायचंद मल शाह | चणा | ४० | ५० | २०.०० |
| ३९ | रमेश ट्रेडींग क | चणा | १० | ५० | ५.०० |
| ४० | रामजी भवानजी ॲंड कं | उडीद | ६ | ५० | ३.०० |
| ४१ | रमणिकलाल ब्रदर्स | मुग | ३० | ५० | १५.०० |
| | | मुग | ४५ | ३० | १३.५० |
| | | चणा | ४० | ५० | २०.०० |
| | | मटकी | २६० | ३० | ७८.०० |
| | | मटकी | २९ | ५० | १४.५० |
| | | तूर | ७० | ३० | २१.०० |
| ४२ | एस शांतीलाल ॲंड कं | चवळी | २७३ | ३० | ८१.९० |
| | | डाळी | १७७ | ३० | ५३.१० |
| ४३ | संजय स्टोर्स | मुग | १२ | ६० | ७.२० |
| | | वाटाणा | ११ | ३० | ३.३० |
| ४४ | शाह लालजी लखमशी ॲंड कं | मुग | १८७८ | ३० | ५६३.४० |
| | | मुग | २६ | ५० | १३.०० |
| | | डाळी | ६०३ | ३० | १८०.९० |



0000

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४५ | शांती दालमिल | मुग | १९४ | ३० | ५८.२० |
| | | चवळी | १०९ | ३० | ३२.७० |
| | | वाटाणा | ६६ | ५० | ३३.०० |
| | | चणा | ६ | ३० | १.८० |
| | | चणा | १०६ | ५० | ५३.०० |
| | | वाल | १७ | ३० | ५.१० |
| | | मसूर | १३७ | ३० | ४१.१० |
| | | मटकी | ५० | ३० | १५.०० |
| ४६ | शांतीनाथ टेंडींग कं | मुग | १६८ | ३० | ५०.४० |
| | | वाल | ९६ | ५० | ४८.०० |
| | | मटकी | १९८ | ३० | ५९.४० |
| | | मटकी | २ | ५० | १.०० |
| ४७ | श्री साई ट्रेडींग कं | मुग | ३८१ | ३० | ११४.३० |
| | | डाळी | १८९ | ३० | ५६.७० |
| ४८ | सिध्दीविनायक कार्पोरेशन | मुग | ५७४ | ३० | १७२.२० |
| ४९ | वसंतलाल कानजी | वाल | २ | ५० | १.०० |
| ५० | वासवी ट्रेडर्स | चवळी | ३५ | ३० | १०.५० |
| | | चवळी | ९५ | ५० | ४७.५० |
| | | मटकी | ६० | ३० | १८.०० |
| ५१ | विजपार विरजी ॲंड कं | मुग | ५० | ३० | १५.०० |
| | | चवळी | २ | ३० | ०.६० |
| | | वाटाणा | ७४ | ५० | ३७.०० |
| | | चणा | १९ | ३० | [illegible].७० |
| | | चणा | १२ | ५० | ६.०० |
| | | मसूर | १८ | ३० | ५.४० |
| | | डाळी | १२ | ३० | ३.६० |
| ५२ | विकास एंटरप्रायजेस | वाल | १२५ | ३० | ३७.५० |
| ५३ | विशाल एंड कं | चवळी | ३५ | ३० | १०.५० |
| | | वाटाणा | २५ | ५० | १२.५० |
| | | चणा | ५७० | ३० | १७१.०० |
| | | चणा | १३० | ५० | ६५.०० |
| | | मटकी | १४५ | ३० | ४३.५० |
| एकूण | | | १३९९५ | | ४९००.१० |

उपरोक्त नमूद साठयामध्ये उपस्थितांनी दिलेल्या माहीतीनुसार ६ आयातदार/परवानाधारकांच्या जप्त साठयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | व्यापाऱ्याचे नांव | जिन्नस | साठा/नग(बाचकी) | वजन क्विंटलमध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | मैत्री इंटरनॅशनल | चवळी | २११६(५०) | १०५८.०० |
| २ | करमशी पचारीया अँड कं. | मूग | ६८१९(३०) | २०४५.७० |
| | | मूगडाळ | ५(३०) | १.५० |
| ३ | विची अॅग्रो | तीळ | ११(५०) | ५.५० |
| | | तीळ | ६(२०) | १.२० |
| | | काबुलीचणा | ४००(३०) | १२०.०० |
| | | ग्रीन पीस | १(४०) | ०.४० |
| | | काळे उडीद | ४(५०) | २.०० |
| | | सफेद उडीद | ७(५०) | ३.५० |
| | | चवळी | ५९७९(५०) | २९८९.५० |
| | | चवळी | १६३९(३०) | ४९१.७० |
| | | चिंच | १० (२०) | २००.०० |
| ४ | ताज अॅग्रो | ग्रीन पीस | ४१९४(३०) | १२५८.२० |
| ५ | प्रितेश ट्रेडींग | ग्रीन पीस | २६२(५०) | १३१.०० |
| | | चीक पीस | १९६१(५०) | [illegible] |
| ६ | हिम्मतलाल हिरजी अँड कं. | काबूली चणा | १०२३(५०) | ५११.५० |
| | | काबुली चणा | १०५८(३०) | ३१७.४० |
| | | चवळा | २१२(५०) | १०६.०० |
| | | चवळी | ८३८(३०) | २५१.४० |
| | | मूग | १९१२(३०) | ५७३.६० |
| | | लिमा बिन्स | २८०(५०) | १४०.०० |
| | एकूण | | | १११८८.६० |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील अन्नधान्य/कडधान्यांचा साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०४/१२/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०४/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. शांतीदाल मिलचे भागीदार प्रफुल मालशी गडा, श्री. साई ट्रेडिंगचे मालक उर्मिला मालशी गडा, मे. एस. शांतीलाल ॲन्ड कंपनीचे मालक निकी भोगीलाल गडा, मे. करमशी पचारिया ॲन्ड कंपनीचे भागीदार दिलीप गाला, मे. हितेन ॲन्ड कंपनीचे भागीदार हितेन श. शंभिया, मे. हिंगलजा एन्टरप्रायझेसचे मालक रमेशचंद्र शिवजी भद्रा, मे. विकास एन्टरप्रायझेसचे मालक रमेश पुरुषोत्तम गोरी, मे. गुलाब

ट्रेडर्सचे मालक युसूफ अलिभाई कपासी, मे. संजय स्टोअर्सचे मालक जयेश भावजी वोरा, मे. हंसराज भारमल या संस्थेच्या मालकाचा मुलगा चेतन नेमचंद सावला, भक्ती डोबिंवलीचे मालक भुपेंद्र मुळचंद निसर, मे. मोहनलाल ॲन्ड ब्रदर्सचे भागीदार संजय हरकिसन शहा, मे. जशोदा एन्टरप्रायझेसचे मालक दिपक गोरी, मे. महावीर ट्रेडिंगचे मालक भरत ताराचंद जैन, मे. किरण एन्टरप्रायझेसचे मालक जयराम राधवजी मंगे, मे. भगवती ट्रेडर्सचे मालक संजय प्रतप कोठारी, मे. सिध्दीविनायक कॉर्पोरेशनचे मालक नितीन प्रधान मंगे, मे. वसंतलाल कानजीचे भागीदार शांतीलाल कानजी पटेल, मे. जे.जे. एन्टरप्रायझेसचे मालक जयंतीलाल पुरुषोत्तम ठक्कर, मे. दोढीया स्टोअर्सचे मालक किशोर मुळचंद दोढीया, मे. किर्ती स्टोअर्सचे मालक किर्ती सोमचंद मारु, मे. चरण स्टोअर्सचे व्यवस्थापक राणसी गोपाल बारोट, मे. निता स्टोअर्सचे मालक देवचंद टोकरसी नागडा, मे. मुक्ती स्टोअर्सचे मालक सुरेश हिरजी भानुशाली, मे. शांतीलाल ट्रेडिंग कंपनीचे मालक हरिश खिमजी मोमया, मे. जीगर नविन ॲन्ड कंपनीचे मालक नविन शंकरलाल भानुशाली, मे. रमणिकलाल ब्रदर्सचे मालक जयेश जेठालाल केनिया, मे. जनता (पी) स्टोअर्सचे मालक यांचा मुलगा संदिप प्रेमजी देढीया, मे. धनवीर ट्रेडिंग कंपनीचे मालक भरत हंसराज शहा, मे. हेम सन्सचे मालक नेमचंद टोकरशी शहा, मे. वासवी ट्रेडर्सचे मालकाचे पती राजेश हिरजी भानुशाली, मे. कुंवरजी खिमरोजचे भागीदार प्रितेश कल्याणजी देढीया, मे. मेघराज मार्केटिंगचे मालक गोविंद धिरजलाल भानुशाली, मे. विशाल ॲन्ड कंपनीचे मालक विशाल रतिलाल सेठिया, मे. विजपार विरजी ॲन्ड कंपनीचे भागीदार केतन कल्याणजी देढीया, मे. जे.पी. स्टोअरचे मालक परेश पोपटलाल वोरा, मे. रायचंद एल. शहा. चे मालक अजय रायचंद शहा, मे. पटेल स्टोअर्सचे भागीदार नारायण रामजी पटेल, मे. पराग ट्रेडिंग कंपनीचे प्रतिनिधी धिरज मणिलाल दंड, मे. जे. के. डाल मिलचे मालक किशोर मोरारजी छेडा व मे. रामजी भवानजी ॲन्ड कंपनीचे भागीदार मयूर अमृतलाल गाला यांनी उपस्थित राहून स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. तथापी, मे. हिम्मतलाल हिरजी ॲन्ड कंपनीचे भागीदार प्रितेश हिम्मतलाल नंदू, मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनीचे मालक प्रितेश हिम्मतलाल नंदू, मे. विची ॲग्रो प्रा.लि. चे संचालक चिराग हितेन शहा, मे. ताज ॲग्रोचे संचालक हिम्मत जमनादास चांद्रा, मे. मैत्री इन्टरनॅशनलचे मालक हेमंत शांतीलाल नंदू या उपस्थित आयातदार असलेल्या साठा मालकांच्या साठवणूकीचे तपशिल मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेजचे व्यवस्थापक हेमंत शिवजी सुआली यांनी सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सदर साठा मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दिनांक ०५/१२/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. तसेच सदर सुनावणीस उर्वरीत साठा मालक अनुपस्थित राहिले.

दिनांक ०५/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. हिम्मतलाल हिरजी ॲन्ड कंपनीच भागीदार प्रितेश नंदु, मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनीचे मलक प्रितेश नंदु, मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि.चे संचालक हिम्मत जे चांद्रा, मे. विची ॲग्रो प्रोडक्टस प्रा.लि. चे संचालक चिराग शहा व मे. मैत्री इंटरनॅशनचे मालक हेमन शांतीलाल नंदु यांच्यासह मे.

सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेजचे व्यवस्थापक हेमंत शिवजी सुआली यांनी उपस्थित राहून साठवणूकीचे तपशिल व साठा मालकांनी जप्त साठ्या संदर्भात पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली. सदर सुनावणीसही उर्वरीत साठा मालक हे अनुपस्थित राहिल्याने त्यांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १३/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १३/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेजचे व्यवस्थापक हेमंत शिवजी सुआली, मे. किराणा घरचे मालक वालजी मोमया शाह, मे. रमेश ट्रेडिंग कंपनीचे मालक दामजी लक्ष्मण पटेल, मे. के. किशोर ॲन्ड कंपनीचे प्रतिनिधी मंगल सिंग यांनी उपस्थित राहून स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. तसेच मे. पटेल रिटेल प्रा.लि. चे संचालक धनजी राघवजी पटेल, मे. जनता स्टोअर्सचे मालक मनुसुख आर. गाला, मे. जीवन सोसायटी स्टोअर्सचे मालक श्रीमती जोत्स्ना शामजी शाह, मे. प्रविणचंद्र ठाकरसी ॲन्ड सन्सचे मालक उपेश प्रविण शाह, मे. शाह लालजी लखमशी ॲन्ड कंपनीचे भागीदार जयेश रमेशचंद्र सावला, मे. देवाराम चौधरी स्प्राउटस् सप्लायरचे मालक देवाराम चौधरी व मे. कुंवरजी खिमराज ॲन्ड कंपनीचे भागीदार नितेश महेंद्र व्होरा यांनी उपस्थित राहून त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदने टपालामार्फत सादर केल्याचे सांगितले. सदर सुनावणीसही अनुपस्थित असलेल्या साठा मालकांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी ठेवण्यात आली आहे.

उपरोक्त उपस्थितांपैकी काही साठा मालक हे मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राच्या बाहेरील असल्याने व सदर साठा मालकांकडे घाऊक अथवा किरकोळ परवाना नसल्याचे सांगितल्याने सदर साठा मालकांच्या बाबतीत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

उपरोक्त सुनावणीस उपस्थित न राहिलेल्या साठा मालकांना अंतीम सुनावणीची संधी देण्यात येत असून सदरच्या सुनावण्यांमध्ये उपस्थित साठा मालकांनी त्यांचे लेखी निवेदने सादर केली असून सदर प्रकरणी जप्त मुद्देमाल हा नाशवंत असल्याने तो खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक ०४/१२/२०१२, ०५/१२/२०१२ व १३/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित विविध आस्थापनांच्या साठामालकांनी साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांच्याकडे उपलब्ध असलेले पुरावादर्शक कागदपत्रे म्हणून घाऊक अथवा किरकोळ परवानाची छायांकित प्रत, जप्त साठ्याची खरेदी बिले, इतर प्राधिकरणाकडील त्यांच्या

व्यवसायाकरिता आवश्यक परवाने तसेच या व्यतिरीक्त इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती यापैकी उपलब्धतेनुसार कागदपत्रे सादर करुन त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, त्यांच्या कार्यक्षेत्रातील जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्याचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेज, ए ७९, टिटिसी एमआयडीसी इंडस्ट्रियल एरीया, खैरणे या ठिकाणी धाड टाकून घेण्यात आलेल्या तपासणीमध्ये विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदरचा साठा पुढील तपासणीच्या अधिन राहून जप्त करुन मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेज चे मॅनेजर यांचेकडे सुपूर्द करण्यात आला व सदरचा साठा पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/

0012
ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवांना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता असुन सदर अनुसुचित वस्तुंचे व्यापार करणारे किरकोळ व्यापाऱ्यांना दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ अन्वये किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र एस.ओ. ८८०(ई), दिनांक ३० मार्च २००९ अन्वये दिनांक ०१/०४/२००९ पासुन गव्हावरील निर्बंध काढण्यात आले असल्याने गहु चा व्यापार करणारे घाऊक अथवा किरकोळ व्यापाऱ्यांना गव्हाच्या व्यवसायासाठी परवाना घेण्याची गरज नाही. तसेच महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ व दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ मधील नमुद अनुसुचित वस्तुंच्या परिशिष्ट मध्ये कडधान्यांच्या यादीत वाल, मठ, कुटीदारो, कुलथी व सॅमो हे समाविष्ट नसल्याने सदर वस्तुंच्या व्यापाऱ्यांनाही नमुद आदेशान्वये परवाना घेण्याची गरज नाही.

सुनावणीस उपस्थित साठा मालकांपैकी मे. धनविर ट्रेडिंग कंपनी यांचा वालचा साठा, मे. जीवन सोसायटी स्टोअर्स यांचा मटकीचा साठा, मे मुक्ती स्टोअर्स यांचा मटकीचा साठा, मे. वसंतलाल कानजी पटेल यांचा वालचा साठा व मे. विकास एन्टरप्रायझेस यांचा वालचा साठा हा कडधान्यांचा साठा अनुसुचित वस्तुंच्या यादीमध्ये समाविष्ट नसल्याने सदर साठयाच्या साठामर्यादेवर निर्बंध नाही. सबब, सदर साठामालकांचा जप्त करण्यात आलेला संपुर्ण कडधान्यांचा साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तीधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८

तासात कळविले पाहीजे व अनुज्ञप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे " असे स्पष्ट नमुद केले आहे.

मे. हिंगलाज एन्टरप्रायझेस, मे. हितेन ॲन्ड कंपनी, मे. जे. जे. एन्टरप्रायझेस, मे. जशोदा एन्टरप्रायझेस, मे. जीगर नविन ॲन्ड कंपनी, मे. किरण एन्टरप्रायझेस, मे. कुवरजी खिमराज, मे. पराग ट्रेडिंग कंपनी, मे. प्रविणचंद ठाकरशी ॲन्ड सन्स, मे. एस शांतीलाल ॲन्ड कंपनी, मे. शांतीनाथ ट्रेडिंग कंपनी, मे. श्री साई ट्रेडींग कंपनी, मे. वासवी ट्रेडर्स, मे. शाह विजपार विरजी ॲन्ड कंपनी, मे. विशाल ॲन्ड कंपनी व मे. करमशी पाचारीया ॲन्ड कंपनी या सर्व आस्थापनांच्या मालकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद वेअरहाऊसमध्ये विविध अन्नधान्य/कडधान्याच्या साठयाची साठवणुक केले असल्याचे सांगितले. उपरोक्त साठामालकांनी निवेदनासोबत सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचे अवलोकन करता, त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाने व इतर विविध परवाने धारण केले असुन या व्यतिरीक्त जप्त साठ्याची खरेदी बिले सादर केली आहेत. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." त्या अनुषंगाने सदर साठामालकांनी त्यांच्याकडील घाऊक परवान्यांवर मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. हे अतिरीक्त गोदाम म्हणुन नोंद असल्याचे अथवा कायमस्वरुपी अतिरीक्त गोदाम नोंदीकरीता अर्ज अथवा सुचनापत्र सादर केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, उपरोक्त साठा मालकांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यांमधील अटीं/शर्तीचे पालन करुन त्यांचा खरेदी केलेला विविध अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा अवैध साठवणुकीच्या उद्देशाने साठवणुक केल्याचे दिसुन येत नसल्याने उपरोक्त सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला संपुर्ण साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ अन्वये अनुसुचित वस्तूंचा व्यापार करणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. सदर आदेशान्वये अन्नधान्य, डाळी/कडधान्य, खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंचे किरकोळ व्यापारी हे विविध प्रकारचे अन्नधान्य विक्रीकरिता एकत्रितरित्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात १०० क्विंटल व त्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रात ५० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक करीत असल्यास तसेच विविध प्रकारच्या डाळी/कडधान्य विक्रीकरिता एकत्रितरित्या ५० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक करीत असल्यास त्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

मे. भक्ती डोंबिवली, मे. चरण स्टोअर्स, मे. देढीया स्टोअर्स, मे. देवराम चौधरी स्प्राउडस् सप्लायर्स, मे. गुलाब ट्रेडर्स, मे. शाह हंसराज भारमल ॲन्ड कंपनी, मे. हेमसन्स स्टोअर्स पारला, मे. जनता प्रोव्हिजन स्टोअर्स, मे.

किर्ती स्टोअर्स, मे. निता स्टोअर्स व मे. संजय स्टोअर्स या साठामालकांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात ते अन्नधान्य/कडधान्याचे किरकोळ व्यापारी असुन त्यांच्या दुकानात विक्रीसाठी साठवणुक करीत असलेले विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा विहीत मर्यादेच्या आत असल्याने त्यांना किरकोळ परवान्याची गरज नसल्याचे सांगितले आहे. सदर साठामालकांनी मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. येथे साठयाची पत राखण्यासाठी साठवणुक केल्याचे सांगुन त्यांच्या आवश्यकतेनुसार साठवणुक केलेला साठा हा विक्रीसाठी त्यांच्या दुकानात घेऊन जात असल्याचे सांगितले. सदर साठा मालकांपैकी काही साठा मालकांचा जप्त असलेला साठा हा अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला तसेच इतर साठा मालकांचा अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विहीत मर्यादेपेक्षा कमी असल्याने त्यांना किरकोळ परवान्याची गरज नसल्याची बाब निदर्शनास येते. सबब, या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला विविध अन्नधान्य/कडधान्यांचा संपुर्ण साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

मे. मैत्री इंटरनॅशनल यांनी केलेल्या खुलाशात, सुनावणीमध्ये केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने ते निवेदन सादर करीत असल्याचे सांगून त्यांनी साठा आयात करुन नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केला असुन त्याचे तपशिल म्हणुन नियमानुसार वेळोवेळी सुचनापत्र तसेच मासिक विवरणपत्राद्वारे अवगत केले आहे. निवेदनासोबत

साठवणुकीचा गोषवारा, सुचनापत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्रीच्या छायांकित प्रती सादर केल्याचे सांगुन सदर कागदपत्रांची छाननी करुन त्यांचा जप्त असलेला कडधान्याचा साठा लवकरात लवकर मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. मैत्री इंटरनॅशनल यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला चवळी या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी नियमितरित्या सादर केले आहे. मे. मैत्री इंटरनॅशनल यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, चवळी या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ३०३४९७९ दिनांक २५/०९/२०१२ अन्वये ४६० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ३०५४३५७ दिनांक २६/०९/२०१२ अन्वये ७४७.२५ क्विंटल चवळी या कडधान्याचा साठा आयात करुन नमुद वेअरहाऊसमध्ये साठावणुक केला असल्याचे तसेच त्यापैकी १४८ क्विंटल साठयाची उचल करुन उर्वरीत साठा शिल्लक असल्याचे दिसुन येते. मे. मैत्री इंटरनॅशनल यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. मैत्री इंटरनॅशनल यांचा आयात केलेला चवळी या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांनी केलेल्या खुलाशात, सुनावणीमध्ये केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने ते निवेदन सादर करीत असल्याचे सांगून त्यांचा नमुद वेअरहाऊसमधील आयात केलेला साठा जप्त असल्याचे त्यांना समजले. त्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेले सुचनापत्राची प्रत, बिल ऑफ लेडींग, बिल ऑफ एन्ट्री व मासिक विवरणपत्राच्या छायांकित प्रती निवेदनासोबत जोडले आहे. त्यामुळे त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याबाबत संबंधितांना तात्काळ सुचित करावे असे नमुद केले. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या साठयापैकी तिळ, ग्रिन पिस, काळे उडीद व सफेद उडीद वगळता चवळी व काबुली चणा या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी नियमितरित्या सादर केले आहे. मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, चवळी या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ३३०६७३७ दिनांक १३/१०/२०१२ अन्वये ४४३.८८ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ९२०६२४१ दिनांक १२/१०/२०१२ अन्वये ११५.०० क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ८२०६२४३ दिनांक १३/१०/२०१२ अन्वये १३०.०० क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ८०५७७८६ दिनांक २७/०९/२०१२ अन्वये २३८.०० क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७९५८३७४ दिनांक १५/०९/२०१२ अन्वये १२४.४२० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ४२०६१३३ दिनांक

१३/१०/२०१२ अन्वये २३०.०० क्विंटल साठा तसेच बिल ऑफ एन्ट्री क्र. ९१४२७२५ दिनांक ०६/१०/२०१२ अन्वये ३६३.७८ क्विंटल काबुली चणा या कडधान्याचा साठा आयात करुन नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केला असल्याचे दिसुन येते. मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला सांठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांचा आयात केलेला चवळी व काबुली चणाचा आयात केलेला कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जे चंद्रा यांनी केलेल्या खुलाशात ते कडधान्याच्या साठयाचे आयातदार असुन त्यांचा मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. येथे आयात केलेला हिरवे वाटाणाचा ४१९४ बाचक्यांमधील साठा जप्त असुन त्यांनी याबाबत चर्चगेट येथील कार्यालयात अवगत केले असल्याने त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला हिरवे वाटाणा या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, हिरवे वाटाणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५३१३ दिनांक १०/०७/२०१२ रोजी १३७८.९० क्विंटल साठा आयात केला असल्याचे तसेच त्यापैकी सदरचा हिरवे वाटाणाचा साठा त्यांनी नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्याचे दिसून येत आहे. सदरचा कडधान्याच्या आयात केलेल्या साठयापैकीच नमुद वेअरहाऊसवर साठवणुक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी सुनावणीमध्ये आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद वेअरहाऊसवर शिल्लक असल्याचे सांगुन त्यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व ब्रिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांचा आयात केलेला हिरवे वाटाणाचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी यांनी केलेल्या खुलाशात, सुनावणीमध्ये केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने ते निवेदन सादर करीत असल्याचे सांगून त्यांनी शिधावाटप विभागाचे नियमाचे पालन केले असल्याने त्याचा जप्त साठा मुक्त करुन त्यांना सदर साठयाच्या विक्री करीता वितरणाची परवानगी मिळावी. निवेदनासोबत त्यांनी पुरावादर्शक कागदपत्रे जोडले असुन त्यांचा कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत शिधावाटप कार्यालयास अवगत केले असल्याचे सांगितले. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या

कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला हिरवा वाटाणा व काबुली चणा या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी नियमितरित्या सादर केले आहे. मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, हिरवा वाटाणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७८८५६४७ दिनांक ०७/०९/२०१२ रोजी १५३० बाचक्यांमधील ६९५.७५ क्विंटल तसेच काबुली चणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ८०३१३०४ दिनांक २४/०९/२०१२ रोजी ९६० बाचक्यांमधील ४८०.०० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ८०३१२८९ दिनांक २४/०९/२०१२ रोजी १४४० बाचक्यांमधील ७२०.०० क्विंटल साठा आयात करुन नमुद वेअरहाऊसमध्ये साठावणुक केला असल्याचे तसेच त्यापैकी साठा शिल्लक असल्याचे दिसुन येते. मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी यांचा आयात केलेला हिरवा वाटाणा व काबुली चणा या कडधान्यांचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी यांनी केलेल्या खुलाशात, सुनावणीमध्ये केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने ते निवेदन सादर करीत असल्याचे सांगून त्यांनी शिधावाटप विभागाचे नियमाचे पालन केले असल्याने त्याचा जप्त साठा मुक्त करुन त्यांना सदर साठयाच्या विक्री करीता वितरणाची परवानगी मिळावी. निवेदनासोबत त्यांनी पुरावादर्शक कागदपत्रे जोडले असुन त्यांचा काबुली चणा, चवळी, मुग व लिमा बिन्स या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत शिधावाटप कार्यालयास अवगत केल्याचे सांगितले आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला काबुली चणा, चवळी, मुग व लिमा बिन्स या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी नियमितरित्या सादर केले आहे. मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, काबुली चणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७८३३२३२ दिनांक ०३/०९/२०१२ रोजी ९८० बाचक्यांमधील ४९०.४९ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ८३०६४१९ दिनांक २५/१०/२०१२ रोजी ८८० बाचक्यांमधील २२०.३५ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७७६३२९४ दिनांक २५/०८/२०१२ रोजी ९६० बाचक्यांमधील ४८०.७० क्विंटल, चवळी या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७७८८९६३ दिनांक २८/०८/२०१२ रोजी ४६० बाचक्यांमधील २३०.०० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र.

0018
७४७३६४४ दिनांक २४/०७/२०१२ रोजी १९२० बाचक्यांमधील ४८०.६९ क्विंटल साठा, मुग या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७६९२२६४ दिनांक १७/०८/२०१२ रोजी ४८०० बाचक्यांमधील १२०२.२० क्विंटल व लिमा बिन्स या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ८१३१०१० दिनांक ०५/१०/२०१२ रोजी ४०० बाचक्यांमधील १८१.८९ क्विंटल आयात करुन नमुद वेअरहाऊसमध्ये साठावणुक केला असल्याचे तसेच त्यापैकी साठा शिल्लक असल्याचे दिसुन येते. मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी यांचा आयात केलेला काबुली चणा, चवळी, मुग व लिमा बिन्स या कडधान्यांचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता जप्त साठ्याच्या मालकांनी सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा विविध कडधान्यांचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. मैत्री इंटरनॅशनल, मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि., मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी व मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी यांचा जप्त करण्यात आलेला कडधान्यांचा संपूर्ण साठा तसेच मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांचा जप्त करण्यात आलेला काबुली चणा व चवळी हा कडधान्याचा तसेच चिंच हा अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला संपुर्ण साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांचा मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. या वेअरहाऊसमध्ये तिळ, ग्रिन पिस, काळे उडिद व सफेद उडीद हा स्थानिक बाजारपेठेतील खरेदी केलेल्या कडधान्यांचा साठा साठवणुक केलेला असुन सुनावणीच्या वेळी मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. चे संचालक यांनी सादर केलेल्या निवेदनासोबतच्या कागदपत्रांमध्ये सदर कडधान्याच्या साठयाच्या व्यतिरिक्त उर्वरीत जप्त असलेल्या काबुली चणा व चवळी या आयात केलेल्या साठयाचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली असुन त्याअनुषंगाने त्यांनी आयात केलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. तथापी, स्थानिक बाजारपेठेतील खरेदी केलेला तिळ, ग्रिन पिस, काळे उडीद व सफेद उडीद या साठयाबाबत काहीच भाष्य केलेले नाही. सदर साठयाच्या पुराव्यादाखल त्यांनी साठयाची खरेदी बिले सादर केली नसुन केवळ घाऊक परवाना क्रमांक ४१ फ उप वाशी/संयुक्त परवाना/१९९(घा) हा अन्नधान्य व डाळी/कडधान्याच्या घाऊक परवानाची छायांकित प्रत सादर करुन सोपस्कार पूर्ण केले आहे. स्थानिक बाजारपेठेतील जप्त साठयापैकी तिळ हे खाद्यतेल बिया या अनुसुचित वस्तुच्या यादीमधील असुन त्याकरीता त्यांनी परवाना घेतला नसल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये

त्यांनी अन्नधान्य/कडधान्याच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना घेतला असुन मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांच्या घाऊक परवान्यावर वेगळया गोदामाची नोंद निरंक असल्याचे दिसुन येते. तसेच सदर परवानाधारकाने मे. सॅनफुड ॲन्ड कोल्डं स्टोअरेज प्रा. लि. या गोदामाची अतिरिक्त गोदाम म्हणून नोंद करुन घेण्याकरीता अर्जही सादर केले नसल्याचे दिसून येत आहे. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, सदर प्रकरणी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारकनिहाय परिपुर्ण अहवालात, सदर साठा मालकाने नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्याबाबतचे सुचनापत्र त्यांच्या कार्यालयात सादर न केल्याबाबत नमुद केले आहे.

सबब, मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. या साठा मालकाने तिळचा साठा हा विनापरवाना तसेच इतर कडधान्याचा साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने अवैध साठवणुक करुन स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण करुन ज़ीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे सिध्द झाले आहे. सदर परवाना धारकाने त्याच्या परवान्यावरील नमुद पत्याव्यतिरीक्त अन्य ठिकाणी साठवणुक केल्याचे सुचनापत्र सादर केले नाही अथवा परवान्यावर गोदामाची नोंद करुन न घेतल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ या आदेशामधील तरतुदींचा व सदर आदेशान्वये त्यांना देण्यात आलेल्या परवानामधील अटी/शर्तींचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांचा तिळ, ग्रिन पिस, काळे उडीद व सफेद उडीदचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सुनावणीस उपस्थित साठा मालकांपैकी मे. महावीर ट्रेडिंग कंपनी व मे. मोहनलाल ॲन्ड ब्रदर्स या दोन्ही साठामालकांचा अनुक्रमे चवळी व मुग या कडधान्यांचा साठा जप्त असुन सदर दोन्ही साठा मालक मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राच्या बाहेरील असल्याने व सदर साठा मालकांकडे घाऊक अथवा किरकोळ परवाना आहे किंवा कसे? याबाबत खातरजमा करण्यासाठी सदर साठा मालकांच्या बाबतीत जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा रायगड यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत असल्याने सदर साठा मालकांच्या जप्त साठयाबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर आदेश पारीत करण्यात येतील.

सुनावणीस उपस्थित साठा मालकांपैकी मे. भगवती ट्रेडर्स, मे. किराणा घर, मे. कुवरजी खिमराज ॲन्ड कंपनी, मे. श्री मेघराज मार्केटींग, मे. पटेल रिटेल प्रा.लि., मे. रायचंद एल शहा, मे. रमेश ट्रेडिंग कंपनी, मे. रमणिकलाल ब्रदर्स, मे. सिध्दिविनायक कॉर्पोरेशन व मे. लालजी लखमशी ॲन्ड कंपनी हे घाऊक परवानाधारक तसेच मे. जे.के. दालमिल, मे. जनता स्टोअर्स, मे. के. किशोर ॲन्ड कंपनी, मे. पटेल स्टोअर्स, मे. शहा रामजी

0020 भरमजी ॲन्ड कंपनी व मे. शांती दालमिल्स् हे किरकोळ परवानाधारक असुन सदर साठा मालकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत असल्याने तसेच मे. जे. पी. स्टोअर्स या साठामालकाचा जप्त साठा हा किरकोळ परवानासाठी आवश्यक असलेल्या किमान मर्यादेपेक्षा अधिक असल्याने सदर सर्व साठा मालकांबाबतचा तपासणी अहवाल प्राप्त करुन घ्यावयाचा असल्याने तसेच मे. जाधवजी नरसी, मे. एल. के. मसाला, मे. निरुपमा स्टोअर्स व मे. प्रविणचंद ठाकरसी अँन्ड कंपनी हे साठा मालक आजमितीस झालेल्या सुनावणीस उपस्थित राहिले नसल्याने सदर सर्व साठा मालकांच्या जप्त साठयाबाबत यानंतर आदेश पारीत करण्यात येतील.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. धनविर ट्रेडिंग कंपनी, मे. जीवन सोसायटी स्टोअर्स, मे. मुक्ती स्टोअर्स, मे. वसंतलाल कानजी पटेल व मे. विकास एन्टरप्रायझेस यांचा संपुर्ण अन्नधान्य/कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. हिंगलाज एन्टरप्रायझेस, मे. हितेन ॲन्ड कंपनी, मे. जे. जे. एन्टरप्रायझेस, मे. जशोदा एन्टरप्रायझेस, मे. जीगर नविन ॲन्ड कंपनी, मे. किरण एन्टरप्रायझेस, मे. कुवरजी खिमराज, मे. पराग ट्रेडिंग कंपनी, मे. प्रविणचंद ठाकरशी ॲन्ड सन्स, मे. एस शांतीलाल अँन्ड कंपनी, मे. शांतीनाथ ट्रेडिंग कंपनी, मे. श्री साई ट्रेडींग कंपनी, मे. वासवी ट्रेडर्स, मे. शाह विजपार विरजी ॲन्ड कंपनी, मे. विशाल ॲन्ड कंपनी व मे. करमशी पाचारीया ॲन्ड कंपनी यांचा संपुर्ण अन्नधान्य/कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. भक्ती डोंबिवली, मे. चरण स्टोअर्स, मे. देढीया स्टोअर्स, मे. देवराम चौधरी स्प्राउडस् सप्लायर्स, मे. गुलाब ट्रेडर्स, मे. शाह हंसराज भारमल ॲन्ड कंपनी, मे. हेमसन्स स्टोअर्स पारला, मे. जनता प्रोव्हिजन स्टोअर्स, मे. किर्ती स्टोअर्स, मे. निता स्टोअर्स व मे. संजय स्टोअर्स यांचा संपुर्ण अन्नधान्य/कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. मैत्री इंटरनॅशनल, मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि., मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी व मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी यांचा संपुर्ण अन्नधान्य/कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांचा काबुली चणा व चवळी हा कडधान्याचा तसेच चिंच हा अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला संपुर्ण साठा त्यांना परत करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि. यांचा तिळ, ग्रिन पिस, काळे उडीद व सफेद उडीदचा संपुर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

७) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण साठा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. [illegible]नफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेजचे मालक/भागीदार
२) मे. धनदि[illegible] ट्रेडिंग कंपनी
३) मे. जीवन सोसायटी स्टोअर्स
४) मे मुक्ती स्टोअर्स
५) मे. वसंतलाल कानजी पटेल
६) मे. विकास एन्टरप्रायझेस
७) मे. हिंगलाज एन्टरप्रायझेस
८) मे. हितेन ॲन्ड कंपनी
९) मे. जे. जे. एन्टरप्रायझेस
१०) मे. जशोदा एन्टरप्रायझेस
११) मे. जीगर नविन ॲन्ड कंपनी
१२) मे. किरण एन्टरप्रायझेस
१३) मे. कुवरजी खिमराज
१४) मे. पराग ट्रेडिंग कंपनी
१५) मे. प्रविणचंद ठाकरशी ॲन्ड सन्स

१६) मे. एस शांतीलाल ॲन्ड कंपनी
१७) मे. शांतीनाथ ट्रेडिंग कंपनी
१८) मे. श्री साई ट्रेडींग कंपनी
१९) मे. वासवी ट्रेडर्स
२०) मे. शाह विजपार विरजी ॲन्ड कंपनी
२१) मे. विशाल ॲन्ड कंपनी
२२) मे. करमशी पाचारीया ॲन्ड कंपनी
२३) मे. भक्ती डोंबिवली
२४) मे. चरण स्टोअर्स
२५) मे. देढीया स्टोअर्स
२६) मे. देवराम चौधरी स्प्राउडस् सप्लायर्स
२७) मे. गुलाब ट्रेडर्स
२८) मे. शाह हंसराज भारमल ॲन्ड कंपनी
२९) मे. हेमसन्स स्टोअर्स पारला
३०) मे. जनता प्रोव्हिजन स्टोअर्स
३१) मे. किर्ती स्टोअर्स
३२) मे. निता स्टोअर्स
३३) मे. संजय स्टोअर्स
३४) मे. मैत्री इंटरनॅशनल
३५) मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि.
३६) मे. प्रितेश ट्रेडिंग कंपनी
३७) मे. हिंमतलाल हिरजी ॲन्ड कंपनी
३८) मे. विची ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि.
(मे. सॅनफुड ॲन्ड कोल्ड स्टोरेज यांचे मार्फत)

**प्रत,**

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
- 964 -
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc